जिल्हा परिषद व कोषागार कार्यालयाने
परस्पर ताळमेळ करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जिकोता-२०१८/प्र.क्र.०३ /२०१८, वित्त-६

बाधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१.
तारीख: १२ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम ५७ नुसार निधीची शिल्लक व कोषागार अभिलेख्यातील शिल्लक याचा ताळमेळ घेवून लेखे जुळवून घेणे आवश्यक असते. परंतू भविष्य निर्वाह निधीचे लेखाशिर्ष ८३३६ च्या रक्कमांचा ताळमेळ जुळत नसल्याचे सर्व जिल्हा परिषदांमध्ये निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने पंचायत राज समितीने निर्देश दिल्याप्रमाणे, सदर ताळमेळ पूर्ण करुन फरक निरसित करुन त्याप्रमाणे लेखे अद्ययावत करणे आणि सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकच पध्दत असल्याने जिल्हा परिषदेने व कोषागार कार्यालयाने दोघांतही ताळमेळ करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन आता पुढील प्रमाणे परिपत्रकाव्दारे सुचना प्रसृत करत आहे.

<u>शासन परिपत्रक</u>

सर्व जिल्हा परिषदांनी भविष्य निर्वाह निधीचे लेखाशिर्ष ८३३६ मधील व्यवहारांचा संबंधित कोषागारातील लेख्यांशी दरमहा महिनाअखेर नियमित ताळमेळ घ्यावा.

भविष्य निवार्ह निधीचे लेखाशिर्ष ८३३६ मधील रक्कमांचा ताळमेळ जुळत नसल्यास त्यातील फरकाबाबत योग्य ती पूर्तता करुन ताळमेळ दरमहा महिनाअखेर पूर्ण होईल यांची दक्षता सर्व जिल्हा परिषदांनी घ्यावी.

सदर प्रकरणी ताळमेळ अपूर्ण राहिल्याने भविष्यात कोणताही प्रश्न उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित जिल्हा परिषदांची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१३०५१६०३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9af780863a29e5ba66bbc39e6f9c1e31d9d4bbd5f5159dee9c14cf33ac34321, cn=Narayan Bhaskar Ringane
Date: 2018.02.12 14:50:02 +05'30'

ना. भा. रिंगणे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त, पुणे,नागपूर,औरंगाबाद, अमरावती, नाशिक,कोकण.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
४. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.
५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६. सर्व कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे.
७. सर्व उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन-वित्त-६ संग्रहार्थ.